## नियमित दिवाणी मुकदमा क्र.२४०/२०१६ मधील नि.४५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.२ ने त्यांचे विरूध्द पारित झालेला एकतर्फा आदेश रद्दबातल करून कैफियत देण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.२ च्या मते, त्याला समन्स बजावल्यानंतर दि.२६.०८.२०१६ रोजी त्याने न्यायालयात हजर राहणे आवश्यक होते. मात्र त्याचे नजीकचे नातेवाईक आजारी असल्यामुळे त्याला तातडीने पूणे येथे जावे लागले त्यामुळे तो वकीलपत्र दाखल करू शकला नाही. समन्स मिळूनही प्रतिवादी क्र.२ वकीलपत्र दाखल करू न शकल्यामुळे त्याचे विरूध्द एकतर्फा आदेश पारित झालेला आहे. प्रतिवादी क्र.२ ने त्यांच्या विरूध्द पारित झालेला एकतर्फा आदेश रद्दबातल करून कैफियत देणेस परवानगी मागितली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादीने म्हणणे दिलेले असून, वादीच्या मते, प्रतिवादी क्र.२ चा अर्ज मंजूर करणेस त्याची हरकत नाही.

४. वादी व प्रतिवादी क्र.२ चे विधिज्ञांचा यूक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.२ ला दि.०३.०८.२०१६ रोजी नि.२७ प्रमाणे समन्सची बजावणी झाली असल्याची दिसून येत असून, नि.४४ वरील अर्ज प्रतिवादी क्र.२ ने दि.१८.१०.२०१६ रोजी दाखल केलेला आहे. याठिकाणी हेही नमूद करणे आवश्यक आहे की, अद्याप प्रतिवादी क्र.२ विरूध्द एकतर्फा आदेश पारित झालेला नाही. प्रस्तुतचा दावा हा वादीने वाटपासाठी व स्वतंत्र कब्जासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यात संबंधीतांचे हक्क व अधिकार ठरणार आहेत. अशा परिस्थितीत प्रस्तुत दाव्याचा निकाल गुणदोषावर होणे योग्य ठरेल जेणेकरून संबंधीतांमधील वादांची पुर्नरावृत्ती टळू शकेल. मात्र

त्यासाठी प्रतिवादी क्र.२ ला कैफियत देणेची परवानगी देणे योग्य, न्यायीक व संयुक्तिक ठरेल असे माझे मत आहे. त्या ही पुढे जावून वादीचीही प्रतिवादी क्र.२ चा अर्ज मंजूर करणेस हरकत नाही. सबब, मी पुढील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र.२चा नि.४५ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

वडूज.
दि.१५.११.२०१६

(एन.डी. खोसे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर.वडूज.